# *वार्तापत्र*

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांकः- २८/०१/२०१८

## *भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची पोमके कारवाफाला भेट*

उपविभाग पेढरी कॅम्प कारवाफा अंतर्गत येणाऱ्या पोमके कारवाफा येथे हिवाळी अभ्यास दौरा कार्यक्रमाकरीता गडचिरोली जिल्हयाच्या दौऱ्यावर असलेल्या भारतीय प्रशासकीय सेवेतील बॅच क्रमांक २०१७ मधील १८ अधिकाऱ्यांनी भेट दिली.

यावेळी मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख साो. यांच्या मार्गदर्शनाखाली गडचिरोली पोलीस दलातील पोस्टे, उपपोस्टे, पोमके स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व कार्यपध्दतींची माहिती उपस्थित अधिकाऱ्यांना देण्यात आली. यावेळी या अधिकाऱ्यांनी पोस्टेतील कामकाजाची माहिती घेतली तसेच गडचिरोली पोलीस दलाने कनेक्टींग गडचिरोली प्रोजेक्ट अंतर्गत वायफाय नेटवर्कव्दारे एकमेकांशी जोडल्या गेलेल्या इतर पोस्टे, उपपोस्टे, पोमके यांची माहिती देवून याचे प्रत्यक्ष काम कसे चालते याचे प्रात्यक्षिक त्यांना दाखविण्यात आले. यावेळी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कारवाफा डॉ. बसवराज शिवपुजे साो., पोउपनि. श्री. विक्रांत चव्हाण आणि प्रभारी अधिकारी कारवाफा पोउपनि. श्री. गणेश खराडे यावेळी उपस्थित होते.

